# Fr. Agnel School

Waliv, Vasai (E)

**Std.: X** **I Unit test** **Sub : Marathi** **Marks: 40**

---

**कृती १) पुढील उताऱ्याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

**१) चौकटी पूर्ण करा.** **(2)**

**i)** पंतांना अमृतासारखा वाटणारा रस –

ii) हा पदार्थ पाहून पंतांच्या अंगाचा तिळपापड होई –

iii) धारोष्ण दुधासाठी पंत येथे जात –

iv) पंत या रस्त्याने धावत –

मग मात्र मी चिडलो आणि निश्चय केला की बस्स. यापुढे उपास वजन उतरेपर्यंत उपास! मला मी काटकुळा झाल्याची स्वप्ने पडू लागली. भरल्या ताटावरून मी उठू लागलो. बिनसाखरेचा आणि बिनदुधाचाच काय; पण बिनचहाचा देखील चहा मी पिऊ लागलो. साखर पाहिली, की माझ्या अंगाचा तिळपापड होऊ लागला. केवळ फळांवर मी जगू लागलो. लिंबाचा रस तर मला अमृतासारखा वाटू लागला. धारोष्ण दुधासाठी मी अधूनमधून अंधेरीच्या गोठ्यात जाऊ लागलो. दोरीवरच्या उड्या केवळ खालच्या मजल्यावरील मंडळींच्या 'दुष्टपणाने व आकसाने' केलेल्या तक्रारींमुळे थांबवाव्या लागल्या. दहा उड्या पाय न अडकता मारण्यापर्यंत मी पोहोचलो होतो. कचेरी सुटली, की मी गिरगाव रस्त्याने धावत येऊ लागलो. केवळ पौष्टिक आणि सात्विक आहार सुरू केला.

**२) (i) आकृती पूर्ण करा.** **(1)**

पंतांनी सुरू केलेला आहार

↓ ↓

**३) एका वाक्यात उत्तर लिहा.** **(1)**

i) पंतांना दोरीवरच्या उड्या का थांबवाव्या लागल्या?

**४) स्वमत.** **(3)**

तुम्ही एखादा संकल्प केला आणि तो पूर्ण केला नाही तर कुटुंबातील व्यक्ती कोणत्या प्रतिक्रिया व्यक्त करतील, याची कल्पना करून लिहा.

**कृती २) पुढील कविता वाचून दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

**१) कवितेच्या आधारे खालील कृती केव्हा घडतात ते लिहा.** **(2)**

i) माता धावून जाते....

ii) पृथ्वीवर पक्षिणी झेपावते....

iii) गाय हंबरत धावते....

iv) हरिणी चिंतित होते.....

अग्निमाजि पडे बाळू।
माता धांवें कनवाळू ।।१।।
तैसा धांवें माझिया काजा।
अंकिला मी दास तुझा।।२।।
सर्वेंचि झेंपावें पक्षिणी।
पिलीं पडतांचि धरणीं।।३।।
भुकेलें वत्सरावें।
धेनु हुंबरत धांवे।।४।।
वणवा लागलासे वनीं।
पाडस चिंतीत हरणी।।५।।
नामा म्हणे मेघा जैसा।
विनवितो चातक तैसा।।६।।

**२) कोण ते लिहा.** **(1)**

i) मेघाला विनवणी करणारा –

**३) प्रस्तुत कवितेतील पुढील शब्दांचे अर्थ लिहा.** **(2)**

i) कनवाळू - ii) काजा –

iii) वणवा - iv) वत्सर –

**४) काव्यसौंदर्य.** **(2)**

संत नामदेवांनी परमेश्वराकडे केलेली विनंती सोदाहरण स्पष्ट करा.

**कृती २) (ब) पुढील कवितेची दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे रसग्रहण करा.** **(8)**

**कविता - 'योगी सर्वकाळ सुखदाता'**

**मुद्दे :-**

१) कवितेचे कवी –

२) कवितेचा विषय –

३) कविता आवडण्याची वा न आवडण्याची कारणे –

४) कवितेतून मिळणारा संदेश –

५) प्रस्तुत शब्दांचे अर्थ लिहा –

i) पांखोवा - ii) मृदुत्व - iii) निर्मळ - iv) रसना –

**कृती ३) पुढील कृती सोडवा. (कोणतेही २)** **(4)**

१) 'स्काय इज द लिमिट' ही परिस्थिती केव्हा निर्माण होऊ शकते ते पाठाच्या आधारे लिहा.

२) 'आधी केले मग सांगितले' या उक्तीची यथार्थता स्पष्ट करा.

३) टिप लिहा – डॉ. होमी भाभा

**कृती ४) (अ) पुढील वाक्याचा प्रकार ओळखा.** **(2)**

१) तुमच्या शाळेत मराठी दिवस साजरा करतात का?

२) नेहमी खरे बोलावे.

**ब) कंसातील सूचनेनुसार वाक्यरूपांतर करा.** **(2)**

१) पाचशे रुपये ही मोठी रक्कम आहे. (नकारार्थी करा)

२) हा गुलाब किती सुंदर आहे. (उद्गारार्थी करा)

**क) वाक्प्रचाराचा अर्थ लिहून वाक्यात उपयोग करा. (कोणतेही २)** **(4)**

१) अंगाचा तिळपापड होणे –

२) चक्कर मारणे –

३) सुरुंग लावणे –

**ड) विरुद्धार्थी शब्द लिहा.** **(1)**

१) खाजगी × २) सन्मान ×

**इ) वचन बदला.** **(1)**

१) शाल - २) मासा –

**कृती ५) पुढील लेखनप्रकारांपैकी कोणतीही १ कृती सोडवा.** **(4)**

**१) प्रसंगलेखन**

★ मी पाहिलेला अपघात

**मुद्दे –** अपघात कोठे झाला? – कसा झाला? – तुमचे सहकार्य - अपघात का होतात? - सर्वांनी घ्यावयाची काळजी – संदेश.

**२) वैचारिक लेखन**

★ ‘कोरोना संकट’ या विषयावर पुढील मुद्द्यांच्या आधारे तुमचे विचार लिहा.

